शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष अकरावे : अंक तिसावा**

**एप्रिल–मे–जून २०२२**

## १९९० नंतरची मराठी कादंबरी

**• संपादक •**

नंदकुमार मोरे

**• संपादक मंडळ •**

एकनाथ पाटील । शामसुंदर मिरजकर । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• अतिथी संपादक •**

**डॉ. व्ही. एम. पाटील**

प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**गुंडोपंत पाटील**

मराठी विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**• अतिथी संपादक मंडळ •**

अरुण शिंदे । दीपककुमार वळवी । सुजय पाटील । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• प्रकाशक •**

**प्रकाश दुकळे**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी,

फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१०

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर. फोन नं.: ०२३१–२६५४३२९

**मूल्य : ३००/-**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. प्रकाश दुकळे, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१० येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


संपादकीय .............................. २

१. नव्वदोत्तरी मराठी आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीचे संस्कृती चित्रण — प्रा. डॉ. कांचन नलवडे ............ ७

२. १९९० नंतरच्या कादंबरीतील लैंगिक जाणिवा — डॉ. वैजंयती जाधव-भोसले ...... १२

३. १९९० नंतरची मराठी विज्ञान कादंबरी — डॉ. गीता गवस-येर्लेकर .......... १८

४. आंबेडकरी विचार असणारी १९९० नंतरची मराठी कादंबरी — डॉ. विनोद कांबळे ............... २३

५. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे बदलते स्वरूप — डॉ. अशोक सदाशिव तवर ....... ३०

६. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील पडझडीचे चित्रण. — प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण...... ३९

७. १९९० नंतरची दलित कादंबरी — डॉ. प्रताप गायकवाड ............ ४३

८. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी — प्रा. मृदुला जयंत वाघमारे ........ ४८

९. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील नैतिकता — डॉ. प्रकाश आप्पासो हुलेनवर .... ५३

१०. आदिवासी कादंबरीतील व्यवसाय आणि भाषा — प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ............ ५८

११. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे ..... ६३

१२. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण — प्रियांका अशोक कुंभार ........... ६८

१३. '१९९० नंतरच्या कादंबरीचा आकृतीबंध' — प्रा. वैशाली श्रीकांत गुंजेकर ...... ७१

१४. नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील शोषणव्यवस्थेचे चित्रण — श्री. रघुनाथ आण्णा मुडळे ........ ७८

१५. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — श्री. अशोक जनार्दन पाटील ...... ८२

१६. नव्वदोत्तरी कादंबरीतील माध्यमांतर — डॉ. अजित यल्लाप्पा कांबळे....... ८६

१७. १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात्मक कादंबरीतील नांगरे पाटलांची विजिगीषू वृत्ती — प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात .. ९१

१८. १९९० नंतरची मराठी कादंबरी आणि चित्रपट — डॉ. हेमंत नामदेव कुंभार .......... ९७

१९. १९९० नंतरची मराठीतील स्त्री लिखित - कादंबरी — प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे ... १०२

२०. 'नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जाणिवा' — प्रा. संगीता नामदेव खरात ....... १०८

२१. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजातील 'स्त्री'चित्रण — डॉ. संदीप भ. वाकडे ............ १११

२२. नव्वदोत्तरी मराठी कादंबरी आणि चित्रपट माध्यमांतर — प्रा. डॉ. सागर अशोक लटके .... ११७

२३. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी — प्रा. मोहन बाबुराव चव्हाण ...... १२६

२४. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी — प्रा. डॉ. सुकुमार दादू आवळे .... १३१

२५. धूळपावलं - राजकारणाने विदिर्ण समाजाचे चित्रण — प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे...... १३७

२६. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदना — प्रा. सुहास व्यंकटेश कुलकर्णी ... १४१

२७. तसलिमा नासरीन यांच्या 'लज्जा' कादंबरीतील सामाजिक प्रश्न — प्रोफेसर डॉ.सुभाष वाघमारे ....... १४६

२८. महेंद्र कदम यांच्या तणस कादंबरीची स्त्रीवादी मीमांसा — प्रा. डॉ. सुवर्णा नामदेव पाटील .. १५२

२९. नव्वदनंतरच्या स्त्री-लिखित मराठी कादंबरीतील नवे भान — सुस्मिता आनंदा खुटाळे.......... १५६

३०. नवदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील ग्रामसंवेदनाच्या पडझडीचे चित्रण — श्रीमती सुरेखा बसाप्पा व्हसमने .. १६२

३१. पीक आणि मराठी कादंबरी — डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे ........ १६६

३२. 'हिंदू' कादंबरीतील कृषी व स्त्रीजीवन चित्रण — डॉ. तातोबा बदामे ............... १७३

३३. नव्वदोत्तरी कादंबरीतील आधुनिक विचारांच्या स्त्रीव्यक्तिरेखा — शैला आनंदराव क्षीरसागर ....... १७९




ISSN No. 2319-6025

३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी डॉ. स्वप्निल बुचडे ............ १८४
३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब प्रा. संतोषकुमार डफळापूरकर .... १८८
३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा प्रा. संगिता वामन सूर्यवंशी ...... १९२
३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव प्रा. रेखा काशिनाथ पसाले ..... १९६
३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण .. २००
३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे ..... २०४
४०. 'अस्वस्थ नायक' व'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) २०८
४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे ........ २१२
४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी प्रा. जयवंत शं. सुतार ............ २१५
४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी .. २२१
४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक २२६
४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' डॉ. महावीर विठ्ठल कांबळे ...... २२८
४६. ११९० नंतरची महानगरीय कादंबरी डॉ. मनीषा आझाद नायकवडी ... २३३
४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी लिंगप्पा गुळाळे.................. २३८
४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा प्रा. रघुनाथ चंदर गवळी ........ २४२
४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा डॉ. राजश्री बंडोपंत पोवार ........ २४७
५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व प्रा. डॉ. प्रदीप पाटील ........... २५२
५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी प्रा. गणपत हनुमंत निमसे ........ २५८
५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील २६२
५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण अमोल सुभाष कवडे ............ २६७
५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन अमोल चांदेकर.................. २७१
५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास डॉ. भरत भीमराव जाधव ........ २७६
५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' डॉ. भीमराव खं. वानोळे ........... २८२
५७. १९९० नंतरची दलित कादंबरी डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे............ २८७
५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' प्रा. दत्तू मेंगाळ .................. २९२
५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व डॉ. युवराज देवाळे ............. २९९
६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी प्रा. मोहन चव्हाण ............... ३०३
६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष डॉ. प्रकाश दुकळे ............... ३०९
६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील ......... ३१४
६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change Prof.Kirti Suhas Kurane ३१८
६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels Prof. Anita Powar ..... ३२१
६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s Mrs. Daya Prasad Patil. ३२५


ISSN No. 2319-6025

# '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी'

**दत्तू रावजी मेंगाळ**
प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर, ता.कोरेगाव, जि. सातारा.

**प्रास्तविक :**

'कादंबरी' हा साहित्यप्रकार आजच्या काळातील एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. वास्तव काळातील तीव्र जीवनसंघर्ष, जीवनाला आलेला अफाट वेग, व्यक्ती आणि समाज यांच्यामधील उत्तरोत्तर गुंतागुंतीचे होत जाणारे संबंध, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनाला प्राप्त झालेली परिमाणे या सर्व गोष्टींना आणि या सर्वांच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या व्यामिश्र समग्रतेला स्पर्श करू शकणारा साहित्यप्रकार म्हणून कादंबरी या साहित्यप्रकारास आज अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

'कादंबरी' हा दीर्घ कथात्मक साहित्यप्रकार आहे. महाराष्ट्र भाषेचा कोश (१८२९)यामध्ये कादंबरी या शब्दाचा अर्थ 'निर्मूलन कथा रचून कवीने एक काव्य केले आहे.'[१] असा दिला आहे. मात्र मराठीत या वाङ्मयप्रकाराला रुजलेले 'कादंबरी' हे नाव इंग्रजी संस्कारातून जन्म पावले आहे. "Novel' या संज्ञेचा 'कादंबरी' हा मराठी पर्यायी शब्द असून तो बाणभट्टाच्या 'कादंबरी' या संस्कृत कथात्मक ग्रंथनामावरून मराठी भाषेत रूढ झाला आहे.

'कादंबरी' या साहित्यप्रकाराची व्याख्या करतांना पाश्चात्य अभ्यासक क्याथरीन लीव्हर म्हणतात की, कादंबरी म्हणजे कथनात्म लिखित गद्याचा, बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंतवून टाकणारा रचनाबंध होय.[२] तसेच मराठी अभ्यासक बापट व गोडबोले यांच्या मते, सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक पात्रांची स्वभाव चित्रे आणि काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रूपाने वर्णन करून गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे 'कादंबरी' होय.[३]

एकंदरीत कादंबरी ही विशिष्ट लांबी असलेली, कथासूत्रामध्ये श्रृंखलाबध्द असलेली तसेच विषय, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, संवाद, भाषाशैली अशी विविध रूपे घेऊन निर्माण झालेली असते. इ.स.१८५७ साली बाबा पद्मनजी यांची 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी प्रसिध्द झाली आणि मराठी सहित्यात 'कादंबरी' पर्वास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. कादंबरी ही नंतरच्या कालखंडात विविध आशय-विषय अभिव्यक्त करत विविधांगी विकासीत होत गेलेली आहे. १९९०च्या दशकात कादंबरी हा साहित्यप्रकार विविध मराठी साहित्य प्रवाहात फुलतांना दिसतो. त्यात आदिवासी साहित्य प्रवाहही अपवाद नाही.आज सर्वच साहित्य प्रकारांबरोबर 'कादंबरी' हा साहित्य प्रकार आदिवासी साहित्य प्रवाहात घट्ट पाय रोवून उभा राहतांना दिसतो आहे.

**आदिवासी समाज व आदिवासी साहित्य :**

'आदिवासी' या शब्दाची फोड केली तर 'आदि' म्हणजे 'आरंभी' तर 'वास' म्हणजे 'वास्तव्य' असे सूचक रूप सांगता येते. याचाच अर्थ असा की, 'जे भूमीवर सर्वात प्रथम वास्तव्य करून आहेत त्यांनाच 'आदिवासी' म्हटले पाहिजे. मराठी विश्वकोशात अनुसूचित जमातींना 'आदिवासी, मूळवासी, आदिम, आदिमजाती व टोळ्या, वन्यजाती व गिरीजन'[४] अशी विविध नावे दिलेली आहेत.

'आदिवासी' या समाजदर्शक शब्दाची व्याख्या करतांना अनेक अभ्यासकांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत.त्यापैकी पाश्चात्य मानववंशशास्त्रज्ञ 'गिलीन आणि गिलीन'यांच्या मते, एका विशिष्ट


ISSN No. 2319-6025

भू-प्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानीय गटांच्या समुच्चयाला 'आदिवासी' असे म्हतात.५ तसेच आदिवासी समाजाचे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांच्या मते' भौगोलिक दृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकांदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी.६ अशी व्याख्या केली आहे.

वरील दोनही व्याख्यामधून सर्वसाधारणपणे असे सांगता येते की,आदिवासी जमातींचे निसर्गातील डोंगर सानिध्य, वनवासीपणा, शहर व खेडी यापासूनचे जाणीवपूर्वक दुरावलेपणा, अलिप्तता दाखविले आहे.त्यांचे निसर्गाशी असलेले अद्वैत नातेच यातून स्पष्ट होते.म्हणूनच आदिवासी जमाती या निसर्गप्रेमी, आदिम व प्राचीन आहेत हेच अभ्यासांती सांगता येते.

'आदिवासी' या शब्दाच्या व्याख्येप्रमाणेच आदिवासी साहित्याबद्दल विविध मतमतांतरे आहेत. त्यापैकी डॉ. विनायक तुमराम यांच्या मते, आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य आहे. रानावनातील वंचितांचे ते साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे.ज्यांच्या आक्रोशाला इथल्या समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे.येथल्या क्रूर कठोर न्यायव्यास्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिम समुहाचे ते मुक्तीसाहित्य आहे.७

अशाप्रकारे प्रस्थापित, मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभवविश्वापेक्षा भिन्न अनुभवविश्व असणारे तसेच मध्यमवर्गीय परीघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध हे आदिवासी साहित्य घेते. गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम,दऱ्याखोऱ्यात, जंगली प्राणी आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती-जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर उलगडवून दाखविते. शेकडो वर्षांच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन साहित्याचा विषयच झाला नाही. अशा उपेक्षित,वंचित,दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती- जमातीतील जनसमूहांच्या आक्रोशांचा शाब्दिक आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

**आदिवासी कादंबरीकारांच्या मराठी कादंबरीचा उदय :**

ज्या कादंबरीत आदिवासी समाजाचे जीवनचित्रण येते. ती कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी. अशी सर्वसाधारण व्याख्या आदिवासी कादंबरीची करता येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडाचा विचार करिता 'मराठी कादंबरी' या साहित्यप्रकारात आदिवासी समाजाचे जीवनचित्रण काही मोजक्याच मराठी कादंबरीकारांनी केलेले आहे. तत्कालिन मार्क्सवादी, गांधीवादी आणि सर्वोदयवादी विचारसरणीच्या प्रेरणेतून मराठी कादंबरीत आदिवासी समाजाचे जीवनचित्रण आलेले आहे. महाराष्ट्रात एकूण सत्तेचाळीस आदिवासी समाजगटांचा समावेश अनु. जमाती या संवर्गात केला जातो. त्यापैकी काही ठराविकच समाजगटांचे जीवनचित्रण हे मराठी कादंबरीत आलेले आहे. 'भिल्ल, कातकरी, ठाकर, वारली, माडिया-गोंड, राजगोंड, मुंडा, महादेव कोळी आणि कोरकू' अशा काही मोजक्याच आदिवासी जमातींचे जीवनचित्रण आदिवासीतर कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत केलेले आहे. आणि जे वर्णन आलेले आहे ते कमी प्रमाणात दिसते. त्याचप्रमाणे हे वर्णन मुख्य कथानकाला रंजकता येण्यासाठी आलेले आहेअसे आपणास दिसते.

मराठी कादंबरीचा विचार करिता कुसुमावती देशपांडे यांच्या मते, मराठी साहित्यात आदिम जमातीकडे र. वा. दिघे यांनी प्रथम लक्ष वेधले.८ कुसुमावती देशपांडे यांच्या मताचा विचार करिता मराठी कादंबरीकार र. वा. दिघे यांनी खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाला 'कादंबरी' या साहित्यप्रकारात


ISSN No. 2319-6025

मनाचे स्थान मिळवून दिलेले आहे.

मराठी कादंबरीकार र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा'(१९३९) या कादंबरीत मुख्य कथानकाला रंजकता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी आदिवासी समाजाचे जीवनचित्रण करण्यासाठी आदिवासी सामाज्याचे नेतृत्व करणारी व्यक्तिरेखा या कादंबरीत साकार केलेली आहे. 'पाणकळा' या कादंबरीत मराठी कादंबरीकार र.वा.दिघे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील 'भिल्ल' या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण केले आहे. यानंतरच्या कालखंडात अनेक आदिवासीतर कादंबरीकारांनी आदिवासी समाजवास्तव मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु या कादंबरीकारांना हा अनुभव प्रत्यक्ष आलेला नसल्यामुळे ते वास्तवदर्शी झालेले दिसत नाही.

इ.स. १९६० नंतर मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यामुळे मराठी कादंबरीच्याही कक्षा रुंदावल्या गेल्या. आदिवसी साहित्यप्रवाह कालखंडात आदिवासी नवशिक्षित तरुण साहित्यिक विविध साहित्यप्रकारांत लेखन करू लागले त्यामुळे इ.स.१९७०-८० च्या दशकात आदिवसी साहित्य नावारूपाला आलेले दिसते. त्यातल्यात्यात इ.स. १९९० च्या नंतरच्या दशकात आदिवासी कादंबरीकारांनी मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात लेखन करण्यास प्रारंभ केलेला आहे. या कादंबरीकारांचा जन्मच आदिवासी समाजातील असल्यामुळे त्यांना आपल्या समाजाची पुरेपूर जान आहे. तसेच ते विविध समाजसेवी चळवळीच्या निमित्ताने किंवा नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण व शहरी जीवनाशी त्यांचा संबंध आल्यानंतर त्यांना जे बरेवाईट अनुभव आले ते वास्तवदर्शी अनुभव कादंबरीच्या रूपाने आदिवासी कादंबरीकार मांडू लागलेले आहेत.

आदिवासी समाजातील कादंबरीकारांचा विचार केला तर मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात आदिवासी समाजातील स्त्री लेखिका नजूबाई गावित यांचे नाव प्रथमता येते.त्यांच्या 'तृष्णा'या कादंबरीचा भाग-१ 'आदोर' इ. स. १९९५ मध्ये प्रकाशित झाला आणि आदिवासी समाजातील मराठी कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'तृष्णा' ही त्यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. त्याचप्रमाणे त्यांची दुसरी कादंबरी 'भिवा फरारी' (२००८) प्रकाशित झाली आहे.

'आंध' या आदिवासी समाजातील कादंबरीकार माधव सरकुंडे हे आदिवासी समाजातील दुसरे कादंबरीकार आहेत. त्यांची 'वाडा'(१९९६) ही कादंबरी 'आंध' या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण रेखाटत आहे. त्यानंतर आदिवसी समाजातील कादंबरीकार बाबाराव मडावी यांची 'टाहो'(१९९८) ही कादंबरी प्रकाशित झाली. नंतरच्या कालखंडात आदिवासी समाजातील कादंबरीकार तुकाराम चौधरी यांची 'पाड्यावरचा टिल्या'(२०१८) प्रकाशित झाली आहे. तसेच आदिवासी समजातील साहित्य क्षेत्रातील आघाडीचे कवी व समीक्षक डॉ. विनोद कुमरे यांची 'कोयतूर'(२०२०) ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. आदिवासी समाजातील उच्चशिक्षित व मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात आपला ठसा उमटवणारे कादंबरीकार डॉ.कृष्णा भवारी हे आहेत.त्यांची 'इधोस' आणि 'मातेरं' या कादंबऱ्या आजच्या वास्तव काळातील आदिवासी समाजाचे जीवनचित्रण रेखाटणाऱ्या कादंबरीचा उत्कृष्ट नमुनाच वाचकांस उपलब्ध आहे.

आदिवासी समाजातील काही प्रातिनिधिक कादंबरीकारांच्या मराठी कादंबरीविषयी पुढीलप्रमाणे चर्चा करता येईल.

**तृष्णा :**

आदिवासी समाजातील कादंबरीकाराचा विचार केला असता मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात



ISSN No. 2319-6025

आदिवासी समाजातील स्त्री लेखिका नजूबाई गावित यांचे नाव प्रथमता येते. त्यांनी 'तृष्णा' या कादंबरीचा भाग-१ 'आदोर' इ. स. १९९५ मध्ये प्रकाशित झाला आणि आदिवासी समाजातील मराठी कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'तृष्णा' ही नजूबाई गावित यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी असून ती 'सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन, धुळे' यांनी प्रकाशित केली आहे . 'तृष्णा' ही कादंबरी आसिवासी समजातील कादंबरीकारांचे 'कादंबरी' या साहित्यप्रकारातील पहिले आपत्य आहे म्हणून ती खऱ्या आदिवासींची पहिली कादंबरी ठरते.

आदिवासी समाजातील स्त्री लेखिका नजूबाई गावित यांनी 'तृष्णा' कादंबरी ही 'मावची व भिल्ल' या आदिवासी समाजामधील पात्रांभोवती फिरतांना दिसते.या कादंबरीत 'बोढरीपाडा' या गावातील भिल्ल आदिवासी समाजाचे जीवनचित्रण केले आहे.या गावातील लोकजीवन,लोकरूढी, लोकभ्रम,खानपान पद्धती, पेहराव,आंतरिक भेद, धर्मिक विधी, लग्नविधी, नाचगाणी,वृत्ती-प्रवृत्ती, दारिद्रय आणि पोटासाठी चाललेली वणवण यांचे भावस्पर्शी चित्रण लेखिकेने या कादंबरीत केले आहे.

लेखिका नजूबाई गावित यांनी 'तृष्णा' या कादंबरीत आदिवासी समाजातील 'आट्या,इसऱ्या, झिरप्या, बारक्या, दसू, धुळा, तुक्या, फुल्या,पन्या आणि सूऱ्या' अशी पुरुष व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले आहे. तसेच 'गुंती, शिप्री, रुप, नाथी, मिरु, आशा, सेगा अशी स्त्री व्यक्तिरेखाही या कादंबरीत चित्रित झाल्या आहेत. वाचकांस अपरिचित असणाऱ्या आदिवासी समाजातील नावांचा परिचय लेखिका नजूबाई गावित यांनी या कादंबरीतून करून दिला आहे. या नावांत लेखिकेने दोन किवा तीनच वर्णांचा उपयोग केलेला दिसतो.

आदिवासी समाजातील लेखिका नजूबाई गावित यांनी 'तृष्णा' या कादंबरीत जंगल आधिकारी व गावच्या पाटलाकडून आदिवासी समाजातील स्त्रियांचे केले जाणारे लैंगिक शोषणाचे वर्णन केले आहे. तसेच गावातील सवर्ण व्याभिचारी वेश्याव्यवसाय,सावकार वर्गाकडून होणारे आदिवसी समाजाचे शोषण असे अनेक विषय प्रभावीपणे हाताळलेले आहेत.तत्कालीन आदिवासी समाज्याच्या व्यथा,वेदना,अन्याय-अत्याचार,दडपशाही या अशा अमानवी कृत्यांचा पाठच या कादंबरीत लेखिका नजूबाई गावित यांनी 'तृष्णा' या कादंबरीच्या रूपाने वाचकांसमोर ठेवला आहे.

**वाडा**

'वाडा'ही कादंबरी आदिवासी समाजातील कादंबरीकार माधव सरकुंडे यांची आहे. ती 'देवयानी प्रकाशन,यवतमाळ' येथून इ.स. १९९६ साली प्रकाशित झालेली आहे. 'वाडा' या कादंबरीत 'आंध'या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण रेखाटले आहे. स्वत: लेखक या आदिवासी समाजातील असल्यामुळे त्यांना समाजातील सर्व घटकांची चांगलीच जान आहे. 'आंध' या समजाची बोलीभाषाचा त्यांची या कादंबरीत चपखलपणे वापर केलेला आहे.

लेखक माधव सरकुंडे यांनी 'वाडा' या कादंबरीत 'आंध' या आदिवासी समाज्याच्या वाट्याला आलेले दुःख, दारिद्र्य, शोषण, सामाजिक व्याधी यांचे परिपूर्ण दर्शन या कादंबरीत केलेले आहे. 'आंध' या आदिवासी समाजावरील अत्याचाराची एक वास्तव कथानकच कादंबरीकार माधव सरकुंडे यांनी वाचकांसमोर ठेवले आहे.

**टाहो :**

आदिवासी समाजातील कादंबरीकार बाबाराव मडावी यांची 'टाहो' ही लघुकादंबरी 'प्रियंका



ISSN No. 2319-6025

प्रकाशन, यवतमाळ' या प्रकाशनाने इ.स.१९९८ मध्ये प्रकाशित केली आहे. या कादंबरीत लेखक बाबाराव मडावी यांनी जमीनदार आणि सावकार यांनी आदिवासी समाजाचा केलेला छळ, पिळवणूक, लूट आणि वेठबिगारी याचे संघर्षमय चित्रण केले आहे.

'टाहो' या कादंबरीतील नायक 'भीमा' हा या कादंबरीतील मुख्य सूत्रधार आहे. तो आपल्या समजाच्या अस्तित्व-अस्मितेतेच्या लढ्यासाठी स्वत:चा प्राण पणाला लावतांना दिसतो.आज आदिवासी समाजातील नवशिक्षित तरुण विविध चळवळीतून कार्य करतांना दिसतात.ते आपल्या समाजाच्या विकासासाठी कार्येतत्पर आहेत.त्यांनी फोडलेला टाहो कादंबरीकार बाबाराव मडावी यांनी या कादंबरीत चित्रित केलेला आहे.

**भिवा फरारी :**

'भिवा फरारी' ही कादंबरी आदिवासी समाजातील स्त्री लेखिका नजूबाई गावित यांची आहे. ही कादंबरी 'शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर' यांनी इ.स. २००८ मध्ये प्रकाशित केली आहे. या कादंबरीत लेखिकेने इंग्रजांशी संघर्ष करत आपल्या समाजातील लोकांना जागवण्यासाठी व जगवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ध्येयवादी भिवाची कहाणी सांगितली आहे. ही कहाणी काल्पनिक असली तरी तिला वास्तवाचा आधार दिलेला आहे. आदिवासी समाज्याच्या जीवनपद्धतींचा आणि जीवनसंघर्षाचा जिवंत आलेख लेखिका नजूबाई गावित यांनी या कादंबरीत मांडला आहे.

'भिल्ल' या आदिवासी समाजातील 'भिवा' हा आपल्या कर्तृत्त्वाने माणुसकी कायम राखण्यासाठी सातत्याने समता-संघर्षाची एक अनोखी चळवळ उभारतांना दिसतो.तो सतत अन्यायाच्या गर्तेत सापडलेल्यांना समतेची वागणूक देत त्यांना माणुसकीने जगण्यासाठी सांगत असतो. त्याचप्रमाणे वर्षानुवर्षे आदिवासी समजात रूढ असलेल्या अंधश्रद्धांचा स्त्रियांच्या जीवनावर कसा परिणाम होतो त्याचेही दर्शन लेखिका नजूबाई गावित यांनी या कादंबरीत चित्रित केले आहे.

**पाड्यावरचा टिल्या :**

आदिवासी समाजातील कादंबरीकार तुकाराम चौधरी यांची 'पाड्यावरचा टिल्या' ही कादंबरी 'मेधा प्रकाशन, अमरावती' या प्रकाशनाने प्रकाशित केली आहे. या कादंबरीत लेखक तुकाराम चौधरी यांनी प्रागैतिहासिक पद्धतीने शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्याची व्यथा सादर केली आहे.तसेच या कादंबरीत त्यांनी आदिवसी समाजातील मुलांचे शिक्षण केंद्रित ठेवून एकूण आदिवासी जीवनपद्धतीचा परामर्श घेतलेला आहे.

**कोयतूर :**

आदिवासी साहित्यप्रवाहातील आघाडीचे कवी व समीक्षक डॉ. विनोद कुमरे यांची 'कोयतूर' ही कादंबरी 'शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर' यांनी इ.स.२०२० मध्ये प्रकाशित केली आहे.

'कोयतूर' या कादंबरीत कादंबरीकार डॉ. विनोद कुमरे यांनी आदिवासी गोंड समाजाचे जीवनचित्रण रेखाटले आहे. ही कादंबरी आदिवासी जीवनरुपाला, त्यांच्या समस्याग्रस्तेला, प्रश्नोप्रश्नांना व अभ्युदयामार्गांना सुस्पष्ट करणारी अशी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. विदर्भाच्या भौगोलिक परिसरातील 'गोंड' या आदिवसी समाजावर केंद्रिभूत असलेली ही कादंबरी समस्त आदिवसी समाज्याच्या जीवनसंघर्षाला व त्यांच्या शोषित-वंचिततेला अधोरेखित करतांना दिसते.

आदिवासी समाजातील कादंबरीकार डॉ. विनोद कुमरे यांच्या लेखणीतून प्रथमताच इतक्या कलात्मक, प्रत्ययकारी व प्रभावी पद्धतीने मांडले गेले आहे. त्यमुळे या कादंबरीचे वेगळेपण



ISSN No. 2319-6025

आपल्या सहजपणे लक्षात येते.

अशाप्रकारे आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून आदिवासी समाजातील वास्तव जीवन-जाणीवा विविध कथासूत्रातून गुंफलेल्या आहेत.

**निष्कर्ष**

१) आदिवासीतर कादंबरीकारांच्या कादंबरीपेक्षा आदिवासी समाजातील कादंबरीकारांची मराठी कादंबरी ही अदिवासी जीवनाशी अगदी जवळ जाणारी वास्तवदर्शी कादंबरी आहे.

२) आदिवासी कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत आदिवासी बोली भाषेचा चपखलपणे उपयोग केलेला आहे. त्यामुळे कादंबरीत जिवंतपणा व नैसर्गिकता आली आहे.

३) आदिवासी कादंबरीकार हे आदिवासी समाजाचे प्रत्यक्ष एक घटक आहेत .त्यामुळे त्यांनी जे प्रत्यक्ष पाहिले, भोगले, अनुभवले त्याचे तपशीलवार चित्रण कादंबरीत त्यांनी मांडले आहे.

४) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या समाज्यातील व्यक्तिरेखांना नायकत्त्व दिलेले आहे. हा नायक आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढतांना दिसतो.समाजात सुधारण्यासाठी प्रयत्न करतांना दिसतो.

५) समाजात समता प्रस्तापित व्हावी यासाठी आदिवासी कादंबरीकार सतत आपल्या लेखणीतून सांगतांना दिसतो आहे. त्यासाठी कादंबरीतील नायक हा विविध चळवळीत कार्येतत्पर आहे.

६) आदिवासी कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून आपल्या समाजातील नीतीमूल्ये,चालीरीती, प्रथा, संस्कृतीचे वेगळेपण ,सण-उत्सव आणि बोलीभाषेची गुणवैशिष्ट्ये जतन केली आहेत.

७) आदिवासी कादंबरीकारांची कादंबरी ही समाजात नवमूल्ये रुजवण्याचा सतत प्रयत्न करतांना दिसते.

८) आदिवासी कादंबरीकारांनी ज्या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण कादंबरीत केले आहे. त्या समाजाची आर्थिक, सामजिक, राजकीय व सांस्कृतिक वास्तव परिस्थिती उलगडवून दाखवली आहे.

९) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत प्रस्थपित, मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभवविश्वापेक्षा भिन्न अनुभवविश्व तसेच मध्यमवर्गीय परीघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध घेतला आहे.

१०) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम, दऱ्याखोऱ्यात, जंगली प्राणी आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती-जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर उलगडवून दाखविले आहे.

११) शेकडो वर्षांच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन साहित्याचा विषयच झाला नाही. अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती- जमातीतील जनसमूहांच्या आक्रोशांचा शाब्दिक आविष्कार आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) क्रमवंत जगन्नाथशास्त्री, 'महाराष्ट्र भाषेचा कोश (१९२९), बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा छापखाना मुंबई.प्र.आ.१९२९.

२) गणोरकर प्रभा, धाके वसंत, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश(संपादित), 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश', जी.आर. भटकळ फाऊन्डेशन, मुंबई., प्र.आ. २००१, पृ.क्र.१०७.




ISSN No. 2319-6025

३) बापट, गोडबोले , 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास',व्हीजन प्रकाशनपुणे. ति.आ.१९७३, पृ.क्र.३७.
४) जोशी लक्ष्मणशास्त्री , मराठी विश्वकोश खंड पहिला, म. रा .सा. संस्कृती कोश मंडळ मुंबई, प्र.आ.१९७६,पृ.क्र.२४२.
५) तुकाराम विनायक, 'आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा' विजय प्रकाशन नागपूर, प्र.आ.१९९७, पृ.क्र.७.
६) गारे गोविंद, 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती', अमृत प्रकाशन औरंगाबाद,प्र.आ.१९९३,पृ.क्र.८७.
७) लिंबाळे शरणकुमार (संपा.), 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', मधुराज प्रकाशन प्रा.लि.पुणे, प्र.आ.१९९३,पृ.क्र.१५१.
८) देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरी पहिले शतक (१८५० ते १९५०),मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई., दु.आ.१९७५,पृ.क्र. ३२०.
९) गावित नजूबाई , 'तृष्णा', सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन धुळे, प्र.आ.१९९५.
१०) सरकुंडे माधव, 'वाडा', देवयानी प्रकाशन यवतमाळ, प्र.आ.१९९६.
११) मडावी बाबाराव, 'टाहो', प्रियंका प्रकाशन यवतमाळ, प्र.आ.१९९८.
१२) गावित नजूबाई , 'भिवा फरारी ', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर , प्र.आ.२००८.
१३) चौधरी तुकाराम, 'पाड्यावरचा टिल्या', मेधा पब्लिशिंग हाऊस अमरावती, प्र.आ. २०१८.
१४) कुमरे विनोद, 'कोयतूर', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर , प्र.आ.२०२०.

••



ISSN No. 2319-6025